# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक १९९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार, दि.०७ ऑगस्ट २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## सेन्सेक्स १६६ अंकांनी घसरला, गुंतवणूकदारांचे ३ लाख कोटी बुडाले

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- भारतीय शेअर बाजारात बुधवारी (६ ऑगस्ट) रोजी जोरदार घसरण झाली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण विषयक समितीनं रेपो रेटमध्ये कोणताही बदल केलेला नाही. रेपो रेट ५.५ टक्के ठेवण्याचा निर्णय आरबीआयनं घेतला आहे. याशिवाय अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला टॅरिफ संदर्भात वारंवार इशारे देणं सुरु ठेवलं आहे. यामुळं गुंतवणूकदारांच्या भावना दुखावल्या आहेत. बीएसई सेन्सेक्स १६६.२६ अकांनी म्हणजेच ०.२१ टक्क्यांनी घसरला आहे. सेन्सेक्स ८०५४३.९९ अंकांवर पोहोचला आहे. निफ्टी ५० निर्देशांकात ७५.३५ अंकांनी म्हणजेच ०.३१ टक्क्यांनी घसरुन २४५७४.२० अंकांवर आला आहे. ब्रॉडर मार्केटमध्ये घसरण झाल्याचं पाहायला मिळतं. बीएसई मिडकॅप इंडेक्स १ टक्क्यांची आणि स्मॉलकॅप निर्देशांक १.१४ टक्क्याच्या वाढीसह बंद झाला. बँकिंग सोडलं तर इतर सेक्टोरल निर्देशांकात घसरण झाली आहे. सर्वाधिक विक्री आयटी, फार्मा, रिअल्टी शेअरमध्ये पाहायला मिळाली. बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४४५.०८ लाख कोटी रुपयांवर आलं. मंगळवारी सेन्सेक्सवरील लिस्टेड कंपन्यांचं बाजारमूल्य ४४७.९६ लाख कोटी रुपयांवर होतं. म्हणजेच एका दिवसात बाजारमूल्य २.८८ लाख कोटी रुपयांनी घसरलं. यानुसार गुंतवणूकदारांचं २.८८ लाख कोटी रुपयांचं नुकसान एकाच दिवसात झालं असं म्हणता येईल.

# डोनाल्ड ट्रम्प यांचा भारतावर 'टॅरिफ' बॉम्ब!

## लादला तब्बल ५० टक्के कर, आदेशावर केली स्वाक्षरी



वॉशिंग्टन दि.६ (वृत्तसंस्था)- भारताने रशियाकडून तेल खरेदी न थांबवल्याने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अखेर भारतावर टॅरिफ बॉम्ब टाकला. ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ लावणार असल्याचे ३० जुलै रोजी जाहीर केले होते. भारताने तेल खरेदी न थांबवल्याने त्यांनी यात भरपूर वाढ करणार असल्याचे म्हटले होते. ट्रम्प यांनी २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ भारतावर लावला आहे. कार्यकारी आदेशावर ट्रम्प यांनी स्वाक्षरीही केली आहे. त्यामुळे आता अमेरिकेकडून भारतावर लावण्यात येणारे एकूण आयातशुल्क ५० टक्क्यांवर पोहोचलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयाचा भारताला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

३० जुलै रोजी डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाकडून तेल खरेदी सुरू ठेवल्यास भारतीय वस्तूंवर २५ टक्के टॅरिफ आणि दंडही आकारणार असल्याचे जाहीर केले होते. पण, भारताने अमेरिकेला उत्तर दिले. त्यानंतर रशियानेही ट्रम्प यांना सुनावले. त्यामुळे बिथरलेल्या ट्रम्प यांनी भारतावर आणखी जास्त टॅरिफ लावणार असल्याचे मंगळवारी म्हटले होत. त्यानंतर त्यांनी आता तब्बल २५ टक्के म्हणजे दुप्पट टॅरिफ भारतावर लादला आहे.

अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वाक्षरी केलेल्या आदेशानुसार, टॅरिफ लागू करण्याचा हा निर्णय २१ दिवसांच्या आत लागू होईल. म्हणजे २७ ऑगस्टपासून भारतातून अमेरिकेत निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर टॅरिफचा निर्णय लागू होईल.

## अमेरिकेच्या टॅरिफवर विदेश मंत्रालयाचे ठोस प्रत्युत्तर

### हे तर आर्थिक ब्लॅकमेलिंग-राहुल गांधी

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसंस्था)- ट्रम्प यांच्या या निर्णयाला भारताच्या विदेश मंत्रालयानं उत्तर दिलं आहे. अमेरिका भारताला रशियाकडून तेल खरेदी करत असल्यानं लक्ष्य करत असल्याचं विदेश मंत्रालयानं म्हटलंय. विदेश मंत्रालयासोबत लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी देखील डोनाल्ड ट्रम्प ब्लॅकमेल करत असल्याचं म्हटलंय.

अमेरिकेने अलिकडच्या काळात रशियाकडून तेल खरेदी करत असल्यानं भारताला लक्ष्य केलं आहे. विदेश मंत्रालयाने म्हटले की आम्ही या मुद्द्यांवर आमची भूमिका आधीच स्पष्ट केली आहे, ज्यामध्ये आमची आयात बाजारपेठेच्या घटकांवर आधारित आहे आणि भारतातील १.४ अब्ज लोकांची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या एकूण उद्देशाने केली जाते.

विदेश मंत्रालयाकडून याबाबत इतर देशांचा दाखला देखील अमेरिकेला देण्यात आला आहे. भारतानं ज्याप्रमाणं इतर अनेक देश स्वतःच्या राष्ट्रीय हितासाठी केलेल्या कृती करतात त्याप्रमाणं केलेल्या कृतीमुळं अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लादण्याचा पर्याय निवडला आहे हे अत्यंत दुर्दैवी आहे. आम्ही पुन्हा सांगतो की ही कृती अयोग्य, अन्यायी आणि अवास्तव आहे, असं विदेश मंत्रालयानं म्हटलं. भारत आपल्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व पावले उचलेल, असा इशारा देखील विदेश मंत्रालयानं दिला आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देखील डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून लादण्यात आलेले टॅरिफ हा ब्लॅकमेलिंगचा प्रकार असल्याचं म्हटले आहे. ते म्हणाले की, ट्रम्प यांचा ५०टक्के कर हे आर्थिक ब्लॅकमेलिंग आहे. भारताला एका अन्यायी व्यापार करारात अडकवण्याचा प्रयत्न असल्याचं राहुल गांधी म्हणाले. पंतप्रधान मोदींनी त्यांच्या कमकुवतपणाला भारतीय लोकांच्या हितापेक्षा जास्त महत्त्व देऊ नये, असा टोला देखील राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदींना लागवला आहे.

## सर्व शाळांमध्ये राष्ट्रगीतानंतर आता 'गर्जा महाराष्ट्र माझा' बंधनकारक

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- मराठी शाळेसोबतचं आता सर्व माध्यमाच्या शाळेत राष्ट्रगीतानंतर राज्यगीत गाणे बंधनकारक करण्यात आलं आहे. 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत आता सर्वच शाळांमध्ये गाणे बंधनकारक असेल. जी शाळा याची अंमल बजावणी करणार नाही त्यावर कारवाई करण्यात येईल असा इशारा राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिला आहे.

मराठी शाळेत राष्ट्रगीत आणि राज्यगीत मानवंदनेने गायलं गेलं पाहिजे. मराठी शाळेसोबतचं आता सर्व माध्यमाच्या शाळेतही राष्ट्रगीतानंतर गर्जा महाराष्ट्र माझा हे राज्यगीत गाणं बंधनकारक आहे असा आदेश देण्यात आला आहे.

पूर्वी इयत्ता चौथी आणि सातव्या वर्गाची शिष्यवृत्ती परीक्षा होत होती. त्यानंतर पाचव्या आणि आठव्या वर्गाची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. मात्र, आता यानंतर इयत्ता चौथी, पाचवी, सातवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेऊन शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याचा संकल्प दादा भुसे यांनी व्यक्त केला.

उच्च दर्जाच्या शिक्षणासोबतच आता विद्यार्थ्यांच्याही आरोग्याची काळजी शालेय शिक्षण विभाग घेणार आहे. यापूर्वी विद्यार्थ्यांची जी काही तपासणी व्हायची ती औपचारिकरित्या व्हायची. मात्र, आता पालकांच्या उपस्थितीत आरोग्य पथक विद्यार्थ्यांची तपासणी करणार आणि त्यानंतर विद्यार्थ्यांना एक हेल्थ कार्ड देणार आहे. हे हेल्थ कार्ड त्यांना आयुष्यात अनेक ठिकाणी उपयुक्त पडणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली.

भंडारा येथे शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी अधिकाऱ्यांना काही निर्देश दिलेत.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली अमित शाह, पंतप्रधान मोदींची भेट

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसंस्था)- उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत शिवसेनेचा भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) भक्कम पाठिंबा आहे, असे शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले. दिल्ली दौऱ्यावर असलेल्या उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शिवसेनेच्या सर्व खासदारांसह बुधवारी दुपारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदींची देखील शिंदेंनी सहकुटुंब भेट घेतली. त्यानंतर, पत्रकारांशी संवाद साधताना शिंदेनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला. तसेच, शिवसेना-मनसेच्या युतीवरुन ठाकरे बंधूंना डिवचलं. जनता कामाच्या जोरावर मतदान करते, नावावर नाही अशी बोचरी टीका ठाकरे बंधूंवर केली.

उपमुख्यमंत्री शिंदे हे संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्ली येथे आले असता त्यांनी पंतप्रधानांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.

यावेळी शिंदेंनी मोदींना शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले, तसेच मोदीजीच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्यदलांनी आधी 'ऑपरेशन सिंदूर' आणि आता 'ऑपरेशन महादेव' यशस्वी करून पहलगाम हल्ल्याला जबाबदार असलेल्या दहशतवाद्यांना कंठस्नान घातल्याबद्दल त्यांना शिवशंकराची प्रतिमा देखील भेट दिली. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात केंद्र आणि राज्य शासनाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. तसेच शिवसेना - भाजप युती ही एनडीए अस्तित्वात येण्यापूर्वीपासूनची असून आता या युतीला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने त्यांनी अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच आगामी उपराष्ट्रपती निवडणुकीत शिवसेना एनडीए उमेदवाराला पूर्णपणे समर्थन देईल असेही त्यांनी या भेटीत पंतप्रधानाना सांगितले.

## उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे तीन दिवसांच्या दौऱ्यावर

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसंस्था)- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आज तीन दिवसाच्या दिल्ली दौऱ्यावर दाखल झाले असून येथे उद्या होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीला ते उपस्थित राहणार आहेत. तत्पुर्वी आज उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांनी शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानि जाऊन भेट घेत सविस्तर चर्चा केली.

दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास दिल्ली विमानतळावर उद्धव ठाकरे यांचे आगमन होताच त्यांच्या स्वागतासाठी शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यासह अरविंद सावंत, संजय दिना पाटील, अनिल देसाई उपस्थित होते. लोकसभा निवडणूकीनंतर प्रथमच होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीत कोणत्या मुद्यावर चर्चा होते याकडे महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या नजरा लागून आहेत.

इंडिया आघाडी बैठकीच्या निमित्ताने राहुल गांधी (पान ४ वर)

## महायुती सरकारचा सावळा गोंधळ

### एकाच पदाचा पदभार वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे सोपवण्याचे आदेश

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने एकाच दिवशी दोन वेगवेगळे आदेश काढून एकाच पदाचा पदभार दोन वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे सोपवण्याचे निर्देश दिलेत. त्यामुळे या प्रकरणी नेमक्या कोणत्या आदेशाचे पालन करायचे? हा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. या प्रकाराची राज्याच्या वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे. विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांचे कनिष्ठ एकनाथ शिंदे यांच्यातील कथित सुप्त संघर्षाचा हा परिपाक असल्याचेही सांगितले जात आहे. दरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढलेला निर्देश अंमलात आल्याचे समजते.

यासंबंधीच्या माहितीनुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सामान्य प्रशासन व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील नगरविकास खात्याने हा गोंधळ घातला आहे. या दोन्ही खात्यांनी बेस्ट महाव्यवस्थापक पदाचा अतिरिक्त पदभार बीएमसीच्या दोन वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे सोपवण्याचे आदेश जारी केलेत. विशेष म्हणजे हे आदेश एकाच दिवशी जारी करण्यात आलेत. त्यात फडणवीसांच्या सामान्य प्रशासन विभागाने हा पदभार आशिष शर्मा यांच्याकडे सोपवण्याचे आदेश दिलेत, तर (पान ४ वर)

## महादेवी हत्तीणीला कोल्हापूरला आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांची धडपड

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील नांदणी येथील महादेवी मठातील महादेवी हत्तीणीची रवानगी वनतारामध्ये करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर झालेल्या विरोधानंतर आता राज्य सरकारने पुढाकार घेत सर्वोच्च न्यायालयामध्ये पुनरावलोकन याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर आज वनताराच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चर्चा केली. यावेळी वनतारानेही सकारात्मक भूमिका घेत राज्य सरकारला न्यायालयीन प्रक्रियेत सहकार्य करण्यास तयारी दर्शवली आहे. वनताराशी झालेल्या चर्चेनंतर मुख्यमंत्र्यांनी ट्विट करत माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे की, महादेवी हत्तीण (माधुरी) पुन्हा सुखरुप नांदणी मठाकडे परत देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने जी याचिका करण्याचे ठरविले, त्यात सहभागी होण्याचा (पान ४ वर)

## व्हीव्हीपॅट मशीनवर मतदानाला वेळ लागणार असेल तर बॅलेटवर निवडणुका घ्या

### काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची आयोगाकडे मागणी



मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- राज्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅट मशीन नसणार अस राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तांनी स्पष्ट केले. यासाठी कारण दिले जात आहे की एक प्रभागात जास्त उमेदवार असणार, मतदारांना एकावेळी चार मते द्यावी लागणार त्यामुळे प्रक्रियेला वेळ लागेल आणि मतदान केंद्रावर गर्दी होण्याची शक्यता आहे. पण निवडणुका पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी व्हीव्हीपॅट ची आवश्यकता आहे.

मतदाराने कुणाला मत दिले हे त्यांना समजले पाहिजे. राज्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व्हीव्हीपॅट मशीन शिवाय घेऊ नये, या मशीन नसतील तर बॅलेटवर निवडणुका घ्याव्यात अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या आधीच निवडणूक आयोगावर टीका करण्यात येत आहे.

मुंबईत पत्रकार परिषदेला संबोधित करत असताना वडेट्टीवार यांनी हे सरकार जैन समाजाची फसवणूक करत असल्याचा आरोप केला. भाजप आमदाराने कबुतरखाने याबाबत प्रश्न उपस्थित केला होता, मुंबई महापालिकेने कारवाई केली. जैन समाज रस्त्यावर उतरला तेव्हा भाजपचे मंत्री या निर्णयाविरोधात जातात. म्हणजे निर्णय हेच सरकार घेणार आणि मग यू टर्न पण घेणार. नसलेले प्रश्न आणि समस्या हे सरकार निर्माण करत आहे आणि जैन समाजाचे तारणहार हे सरकार आहे असा दिखावा तयार करत आहे! येणाऱ्या महापालिका निवडणुका समोर ठेवून मतांसाठी भाजप आपली राजकीय पोळी भाजत आहे ,भाजपची ही दुटप्पी भूमिका असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली.

## शेतकऱ्यांसाठी बच्चू कडू राज ठाकरेंच्या भेटीला; मराठवाड्यातील आंदोलनाचे निमंत्रण

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- राज ठाकरे यांच्या भेटीमध्ये केवळ शेतकऱ्यांचा विषय हा एकच संवाद झाला आहे. पुढील आंदोलन आणखी कसे व्यवस्थित होईल, यावर आमच्या दोघांमध्ये चर्चा झाली असल्याची माहिती बच्चू कडू यांनी दिली. राज ठाकरे यांच्या भेटीनंतर कडू यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.

या संदर्भात कडू यांनी म्हटले की, शेतकऱ्यांसाठी असलेले हे आंदोलन केवळ बच्चू कडू यांच्या नावापुरते न ठेवता हे शेतकऱ्यांसाठी असलेले आंदोलन म्हणून कसे पुढे जाईल, असा आमचा प्रयत्न आहे. मी मोठे होणे हा फार महत्त्वाचा विषय नाही. मात्र, शेतकरी जो अडचणीत सापडलेला आहे. सरकार त्यांची टिंगल बाजी करत आहे, हे अतिशय चुकीचे असल्याचे कडू यांनी म्हटले आहे.

दुष्काळ पडला तर आपण कर्जमाफी जाहीर करू, असे देवेंद्र फडणवीस म्हणत आहेत. म्हणजे दुष्काळ पडायची वाट शेतकऱ्यांनी पहावी का? असा (पान ४ वर)

*मुंबईतील बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीसाठी ठाकरे बंधु एकत्र*

## शिवसेना-मनसेप्रणित उत्कर्ष पॅनेल मैदानात

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- आगामी महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी ठाकरे बंधु एकत्र येण्याची चर्चा जोर धरत आहे. विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांत दोनवेळा ठाकरे बंधु एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. तर, यंदा उद्धव ठाकरेंच्या वाढदिनी राज ठाकरेंनी मातोश्रीवर जाऊन त्यांचा शुभेच्छा दिल्याने महापालिका निवडणुकांसाठी शिवसेना-मनसेची युती होणारच, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. ठाकरे बंधुंच्या एकत्र येण्याने दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्येही उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत असून मुंबईतील बेस्टच्या पतपेढीसाठी होणाऱ्या निवडणुकीत शिवसेना आणि मनसेची युती झाली आहे. दोन्ही पक्षाच्या युतीचे पॅनेल येथे निवडणुकीच्या मैदानात असणार आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत दोन्ही ठाकरे बंधू एकत्रित येणार अशा चर्चा सुरू असताना बेस्ट महामंडळाच्या निमित्ताने येथील निवडणुकीसाठी ठाकरे बंधू एकत्र येण्यावर शिक्कामोर्तब झालं आहे. बेस्ट उपक्रम कामगार पतपेढीच्या (पान ४ वर)

## जगात अमेरिकेपेक्षा भारताचे योगदान अधिक

### 'मृत अर्थव्यवस्थे'च्या ट्रम्प यांच्या शेऱ्याला रिझर्व्ह बँकेचे उत्तर

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- भारतीय अर्थव्यवस्था खूप चांगली कामगिरी करत आहे आणि जागतिक आर्थिक विकासात अमेरिकेपेक्षा जास्त योगदान देत आहे, असे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी बुधवारी प्रतिपादन केले. भारताबद्दल 'मृत अर्थव्यवस्था' या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शेऱ्यावर प्रतिक्रिया देताना त्यांनी ही टिप्पणी केली. मध्यवर्ती बँकेने बुधवारी सार्वत्रिक अपेक्षेप्रमाणे व्याजदरात कोणताही बदल न करण्याचा निर्णय घेताना, चालू आर्थिक वर्षासाठी सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढीचा अंदाज ६.५ टक्क्यांवर कायम राखला आणि किरकोळ महागाईचा दर मात्र पूर्वअंदाजित सरासरी ३.७ टक्क्यांपेक्षा कमी म्हणजेच ३.१ टक्के राहण्याचा अंदाज (पान ४ वर)

## मराठवाडा, विदर्भात मुसळधार पावसाचा इशारा

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- भारतीय हवामान विभागाच्या मुंबई वेधशाळेने दिलेल्या पाच दिवसांच्या हवामान अंदाजानुसार, महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांत मध्यम ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ६ ऑगस्टपासून १० ऑगस्ट पर्यंत कोकण, घाटमाथा, मराठवाडा आणि विदर्भ यामध्ये पावसाचे प्रमाण अधिक असणार आहे. त्यामुळे काही जिल्ह्यांना यलो तर काही ठिकाणी ऑरेंज अलर्ट दिला गेला आहे. विशेषतः कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पुणे, सातारा घाटमाथा यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

महाराष्ट्रात पुढील पाच दिवस पावसाचा जोर राहणार असून हवामान खात्याच्या सूचनांचे पालन करून नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती पावले उचलावीत. शेतकरी, विद्यार्थी, वाहनचालक व पर्यटकांनी हवामान अपडेट्सवर लक्ष ठेवणे आवश्यक असल्याचे प्रशासनाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

मराठवाड्यातील लातूर, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव याठिकाणी देखील ७ व ८ ऑगस्ट रोजी मध्यम ते जोरदार पावसाचा इशारा आहे. विदर्भातील यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा, अकोला, (पान ४ वर)

# खड्ड्यांच्या शापातून रस्त्यांना मुक्ती कधी?

कोणत्याही कामाचे योग्य प्रकारे नियोजन केले तर त्याची दुरवस्था होत नाही. विशेषत: राज्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेचा विचार करता, रस्त्यांचे बांधकाम व देखभाल अतिशय म हत्वाचे असते. रस्त्यांचे बांधकाम व्यवस्थित केले असेल व त्याची चांगल्याप्रकारे देखभाल केली जात असेल तर रस्त्यांची दुरवस्था होणार नाही. मात्र सध्या काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे रस्त्यांची फार दुरवस्था झालेली दिसून येते. याचा परिणाम वाहनचालकांना वाहन चालवताना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागते.

आपण जरी नैसर्गिक कारण पुढे केले किंवा वाहतूकदारांना जबाबदार धरले तरी सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. कारण राज्यामधील रस्त्यांची देखभाल करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची असते. सध्या देशात रस्ते बांधणीला केंद्र सरकार अधिक पसंती देत आहे. मात्र रस्त्यांची दुरवस्था पाहून प्रवास कसा करावा असा प्रश्न सर्वसाधारण नागरिकांना पडला आहे. पावसामुळे सर्वत्र रस्त्यात खड्डे पडलेले दिसतात, तर काही ठिकाणी रस्ता एका बाजूने खचणे, दरड कोसळणे व रस्ता वाहून जाणे इत्यादी पाहायला मिळते. तरी सध्या खड्डे बुजविण्याचे काम ठिकठिकाणी सुरू असले तरी दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागते. त्यात पादचाऱ्यांनाही या खड्ड्यांमधून चालताना त्रास सहन करावा लागतोय. ग्रामीण भागात तर रस्त्यांची दैनावस्था पाहायला मिळते. आजही खेड्यातील वाड्यांमध्ये रस्ते असले तरी त्यांची दुरवस्थाच आहे. त्यामुळे आजारी व्यक्तीला अगदी चादरीतून, पालखीतून उचलून घेऊन जावे लागते. असे चित्र आजही ग्रामीण भागात पाहायला मिळते. ही आपल्याकडे शोकांतिका आहे. १९ जुलै २०२३ रोजी रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील इर्शाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या आदिवाशी पाड्यावर दरड कोसळली होती. तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुमारे दीड तास पायी चालत जावे लागले होते. मात्र आजही इथे ग्रामस्थांना पायी जाण्याजोगा रस्ता नसल्याने इथल्या ग्रामस्थांची अवस्था अशीच पाहायला मिळते. या नागरिकांचे इथे रोज काय होत असेल याचा विचार न केलेला बरा. तेव्हा शासकीय स्तरावर गाव तिथे रस्ता आणि तोही सुस्थितीत हवा. गावाला जोडणाऱ्या प्रत्येक वाडीमध्ये जायला कायमस्वरूपी रस्ता केला पाहिजे. तेव्हा अशा गावांची दखल घेऊन शासन पातळीवर आदर्श गाव घोषित करावे. आज आपल्याकडे शहरीभागात रस्ते खड्ड्यात आहेत. खेड्यात तर अनेक रस्त्यावरील पूलही मोडकळीस आले आहे. बऱ्याच ठिकाणी रस्त्याच्या बाजूला गटारं नाही, मग सांगा पाणी वाहून कसे जाणार..!

याचा परिणाम डांबरीकरण केलेला रस्ता पावसाळ्यात वाहून जातो. नंतर रस्ता पावसाच्या पाण्याने वाहून गेला अशा प्रकारची वृत्त ऐकायला मिळतात. मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय २०१० साली घेण्यात आला. अजूनही या महामार्गाचे काम पूर्ण झाले नाही. ३१ मे २०२५ पर्यंत रस्त्याचे काम पूर्ण होईल असे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले होते. आता मार्च २०२६ पर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेश केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री यांनी काम करणाऱ्या कंपन्यांना दिले. मुंबई-गोवा महामार्गाचे काम सुरू झाल्यापासून आतापर्यंत सुमारे २४४० नागरिकांना आपल्या जीवाला मुकावे लागले आहे. तेव्हा लवकरात लवकर या राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण होवो ही तमाम कोकणातील नागरिकांची मागणी आहे.

बऱ्याचवेळा रस्त्यांची दुरवस्था झाली की पावसाचे कारण पुढे केले जाते. नंतर बातम्या प्रसिद्ध होतात. पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असे असेल, तर मग सांगा यात कितपत सत्यता आहे असे वाटते. असे असेल तर देशातील सर्व रस्त्यांची दुरवस्था पाहायला मिळाली असती. यात जुने रस्ते सोडा नवीनही रस्त्यांची दुरवस्थाच असती. सध्या अनेक ठिकाणी रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून त्यात पाणी साचल्याने वाहनचालक, पादचारी व रस्त्याला लागून असलेली दुकाने यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यात काहींचा अपघात होऊन जीव गमवावा लागला आहे. यासाठी लवकर महामार्गाचे काम पूर्ण होणे गरजेचे आहे. म्हणजे चालक, पादचारी व रस्त्यालगतचे दुकानदार बिनधास्तपणे आपले काम करू शकतात. केवळ मुंबई-गोवा महामार्ग नव्हे तर देशात अलीकडच्या काळात अनेक ठिकाणी रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. त्यात काही ठिकाणी निधीअभावी अर्धवट कामे राहिली आहे. त्यामुळे याचा जास्त त्रास सर्वसाधारण नागरिकांना सहन करावा लागतो. तेव्हा राज्यातील महामार्गांचा विचार करता राष्ट्रीय महामार्गाची जबाबदारी ही राज्याची नसून केंद्र सरकारची असते. शहरातील रस्त्यांची जबाबदारी नगर पालिका, महानगर पालिका व स्थानिक स्वराज्य संस्थेची असते. ग्रामीण भागातील रस्त्यांची देखभाल राज्य सरकार त्याचप्रमाणे त्या जिल्ह्यातील जिल्हा परिषदेची असते. असे असले तरी यामध्ये सुजाण नागरिकांची भूमिका अतिशय म हत्वाची असते.

नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून आपल्या विभागात रस्त्यांची दुरवस्था झाली असल्यास लागलीच संबंधित विभागाला तक्रार करून रस्त्याच्या दुरुस्तीविषयी तत्काळ आवाज उठविणे आवश्यक आहे. तेव्हा आपल्या महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे त्याची कारणे शोधून उपायांची नि:पक्षपातीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. म्हणजे राज्यातील रस्त्यांची समृद्धी होण्याला वेळ लागणार नाही. शेवटी रस्त्यांच्या दुरवस्थेला जबाबदार कोण? असे जरी आपण म्हणत असलो तरी त्याला आपणच सर्वजण जबाबदार आहोत, हे मात्र निश्चित.

दर्जेदार रस्ते होण्यासाठी साहित्यही दर्जेदार वापरायला हवे. चांगल्या दर्जाचे साहित्य वापरले गेले तर रस्त्यांची आज ही स्थिती होणे शक्य नव्हते. कंत्राट देण्यापासून सुरू होणारी 'पर्सेंटेज' बंद व्हायला हवी. लोकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी कंत्राटदाराला त्यांच्या कामाचा चांगला मोबदला मिळत नसेल, तर चांगले रस्ते कसे तयार होतील हा प्रश्नही येतोच. लोकांना चांगले रस्ते, चांगले पूल मिळायला हवेत पण त्यासाठी सर्वात आधी सार्वजनिक बांधकाम खात्यातील भ्रष्टाचार थांबवण्याचे शिवधनुष्य पेलण्याचे आव्हान आहे. भ्रष्टाचाराचा पडलेला खड्डा बुजवून सरकारने हे शिवधनुष्य पेलण्याचे धाडस दाखवले, तर राज्यातील रस्ते दर्जेदार होऊ शकतात आणि रस्तेही खड्डेमुक्त होतील.

# संस्कार फॅक्टरी

जेव्हा दोघे मिळवते झाले व एकमेकांना (खुलेआम) अरे-तुरे म्हणू लागले त्याचक्षणी एकत्र कुटुंब पध्दती निकालात निघून विभक्त कुटुंब पध्दतीला सुरुवात झाली.

विभक्त कुटुंब पध्दतीमुळे या महाराष्ट्रात (तरी) दोन केंद्रांची तातडीने स्थापना झाली. पहिले पोळी-भाजी केंद्र व दुसरे बाल-संस्कार केंद्र. या दोन्ही केंद्रात खूप साम्य आहे.

या केंद्रांवरच्या पाट्याच काय पण त्यांची नावं ही खूपशी सारखीच असतात. उदा. अन्नपूर्णा पोळी-भाजी केंद्र व श्रीकृष्ण बाल-संस्कार केंद्र. म्हणजे देव देवतांचीच नावे असतात. संध्याकाळी ५ ते ९ यावेळातच पोळी-भाजी मिळेल व संध्याकाळी ६ ते ८ यावेळातच मुलांवर संस्कार केले जातील, अशा पाट्या ही या केंद्रांवर असतात. म्हणजे सरासरी संध्याकाळी ६ ते ८ या वेळात दोन्ही केंद्रात गरम पोळी भाजी व संस्कारांची भट्टी सुरू असते.

या दोन्ही केंद्रांवर ऑर्डर प्रमाणे तयार माल मिळतो. फक्त माल मिळण्याच्या पध्दतीबाबत या दोन केंद्रांच्या रचनेत थोडासा फरक आहे. म्हणजे पोळी-भाजी केंद्रात पक्का माल मिळण्यासाठी काउंटर असतो.

बाल-संस्कार केंद्राला दोन दरवाजे असतात. एका दरवाज्यातून कुसंस्कारित मुले आत जातात. मग आतमधे त्यांच्यावर अति-उच्च संस्कारांची फवारणी केली जाते. आणि नंतर सुसंस्कारित मुले दुसऱ्या दरवाज्याने बाहेर पडतात, तेव्हा ८ वाजलेले असतात. केवळ तात्पुरती गरज म्हणून निर्माण झालेली ही केंद्रे आता आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग बनलेली आहेत. याचं मुख्य कारण म्हणजे, पहिलं केंद्र हे विभक्त कुटुंबाच्या शारिरिक दूर्बलतेला तर दुसरे केंद्र मानसिक दूर्बलतेला पोषक आहे!

संस्कार आणि संस्कार करणे, याबाबत प्रचंड घोळ आणि गैरसमज या विभक्त कुटुंब पध्दतीच्या पॅटर्नमधे उदयास आले. संस्कारांबाबतचे काही ऑल टाइम फेवरीट गैरसमज : मुलं ही मातीचे गोळे आहेत. पालक व शिक्षक (म्हणजे शाळेतले व केंद्रातले शिक्षक) हे महान शिल्पकार आहेत. तेच मुलांना घडवत असतात.

मुलाचे जितके वय लहान तितका तो अधिक संस्कारक्षम असतो. (म्हणून तर आता तर गर्भ संस्कार करणारी केंद्रे आहेत.)

जनरली संस्कार ही मुलांवरच करण्याची गोष्ट आहे. कारण मोठ्या माणसांचा संस्कारचा कोटा ऑलरेडी फुल्ल झालेला असतो. काहीजणांचा असा ही समज असतो की, जशी दारू जितकी जुनि तितकी ती अधिक मॅच्युअर असते त्याचप्रम णे जून्या म्हणजे सिनीयर सीटीझन्सनी जर मुलांवर संस्कार केले तर ते अधिक मॅच्युअर असतात.

कारण साठीच्या नंतर संस्कार त्यांच्यातून ओव्हरफ्लो होत असतात.

शुभंकरोती किंवा रामरक्षा म्हंटली आणि ती ही संध्याकाळीच तर (च) मुलांवर संस्कार होतात. (वडील लहानपणी शाखेत जाणार्या परीवारातील असतील तर ते संध्याकाळ असं न म्हणता गोरज मुहूर्त असं म्हणतात.)

मुलांना सतत किंवा ठराविक वेळी सुविचार ऐकवले कि त्यांच्यावर चांगले संस्कार होतात. (मुलांना छळण्यासाठी, सुविचारांची पुस्तके घेणारे पालक मी पाहिलेले आहेत.)

सुविचार शक्य नसेल तर पंचतंत्र, रामायण, महाभारत, इसापनिती, शिवाजी व बिरबल अशी पुस्तके वाचून लई संस्कार होतात. (खास करून बोध कथा, नीती कथा किंवा ज्या कथांच्या खालि जाड टाइपात तात्पर्य छापलेले असते अशा कथांची पुस्तके.)

शहराच्या जरा बाहेर, नव्याने उभ्या राहणार्या गृहसंकुलात बाल-संस्कार केंद्रे सुरू झालि नसतील तर तेथील हाउस वाइफ्सच्या फार घुसमट होऊ लागते. कारन सकाळी शाखा नाहि व संध्याकाळी केंद्र नाही यामुळे एक मोठी पोकळी निर्माण होते. मग त्या हावा (हाउस वाइफ) मुलांना संस्कारित करण्यासाठी त्यांनी लहानपणी ऐकलेल्या भक्त प्रल्हाद किंवा बाल ध्रुव यांच्या गोष्टि सांगून त्यांना त्यांचं तात्पर्य विचारतात. मग मुले सांगतात, हीज फादर वॉज डिसगस्टिंग! ही पोचपावती मिळताच त्या हावा माना डोलावतात.

विशेषत: इंग्रजी माध्यमात शिकणार्या मुलांचे पालक संस्काराविषयी फारच दक्ष असतात. त्यांना वाटतं, आपली कल्चर, आपले फेस्टीवल्स आणि आपल्या ट्रॅडिशन्स जर मुलांनी एनजॉय केल्या तर त्यांच्यावर नॅचरली संस्कार होतात. वरील संस्कार दक्ष विभक्त कुटुंब, दिवाली व त्यातही स्पेशलि लक्ष्मी पूजन, पाडवा व नातेवाइकांची बेडींग्ज यासंगी संपूर्ण ट्रॅडिशनल ड्रेसकोड मधे असतात. मग आपल्या मुलांवर संस्कार होण्यासाठि आई बाबा त्यांना, त्यांच्या लहानपणी त्यांनी हे फेस्टीवल्स व इव्हेंटसच कसे सेलीब्रेट केले होते हे इंग्रजीत सांगत असतात.

खरंतर ही यादी फारच मोठी आहे. आपण संस्काराबाबतच्या काही गोष्टी जाणून घेऊ. संस्कारासाठी कुठलेही वय, कुठलिही जागा किंवा कुठली वेळ असा काही प्रकार नसतोच मुळी. किंवा पोळी-भाजी प्रमाणे संस्काराचि रेसिपी उपलब्ध नाही. अमुक-अमुक करा म्हणजे झाले संस्कार असं तर नाहीच नाही!

पहिली गोष्ट समजून घ्या, संस्कार हे होत असतात, म्हणजे ते सर्वांवरच होत असतात. संस्कार काही ठरवून करता येत नाहीत. विनोबांनी म्हंटलं आहे, जे देता येत नाही ते शिक्षण. संस्काराचं ही तसंच आहे. आम्ही मुलांवर संस्कार करतो किंवा आम्ही मुलांना घडवितो असा दावा करणं हा शुध्द मूर्खपणा आहे. असा दावा करणं म्हणजे स्वत:च स्वत:च्या अहंचा फुगा फुगवणं.

आणि मुले जर मातीचे गोळे असतील तर त्यांचे आई-बाप कोण..चिखलाचे डोंगर? मुलं म्हणजे मातीचे गोळे, हे गृहितकच चुकीचे आहे. मुले ही ऊर्जेचे स्त्रोत आहेत, मातीचे गोळे नव्हेत! आणि आपण मुलांना घडविणारे नाहि तर मुलांसोबत घडणारे आहोत, हे ही लक्षात असू द्या.

शाळेच्या पालकसभेत एका अतिदक्ष पालकांचा प्रश्न होता, मुलांना रोज कोण-कोणते सुविचार सांगावेत म्हणजे मुले सुधारतील? यासाठी तुम्ही काही पुस्तकांची नावे सुचवू शकाल का?

रोज सुविचार सांगून जर मुले सुधारली असति तर अनेक प्रश्न चुटकीसरशी सुटले असते!

आचार्य अत्र्यांचं याबाबत एक छान वाक्यं आहे. त्यांनी म्हंटलंय, जर चांदण्यात फिरून कविता करता आल्या असत्या तर रात्री चांदण्यात गस्त घालणार्या गुरख्यांनी महाकाव्यं लिहीलि असती!

एक गोष्ट लक्षात घ्या. मुलांना सुविचार, बोध कथा जरुर सांगाव्यात पण निरपेक्षपणे. काही सांगितल्यावर त्याचे तात्पर्य मुलांना विचारु नका. ते शोधण्याचे स्वातंत्र्य त्यांना द्या. त्यांनी शोधलेले तात्पर्य जर तुम्हाला कळले नाही तर ते त्यांच्याकडून समजून घेण्याचा प्रयत्न करा पण कदापि तुमचे तात्पर्य त्यांच्यावर लादु नका. कारन प्रत्येक गोष्टिला काही एकच तात्पर्य नसते तर अनेक असतात. गोष्ट ऐकणारा कुठल्या परिस्थितीत वाढला आहे, त्याला समाजाकडून काय अनुभव आले आहेत, त्याबाबतचे त्याचे आकलन काय आहे आणि आत्ता तो जे ऐकत आहे, तो ते कुठल्या संदर्भात समजून घेत आहे या आणि अशा अनेक बाबींवर त्या गोष्टीचे तात्पर्य अवलंबून असते. एखाद्या गोष्टीचे रेडीमेड तात्पर्य मुलाला सांगणे म्हणजे त्याला मानसिक व भावनिक दृष्ट्या अपंग करण्यासारखे आहे.

आपण पालक वेगळ्या काळात वाढलो आहोत आणि आता मुलांच्या बाजूचा भवताल वेगळा आहे. त्यामुळे आपल्याला लहानपणी जे मिळालं तेच महान आणि उच्चं होतं. आणि आता आपल्या मुलांनाही तेच मिळालं पाहिजे, नाहितर वाटच लागलि मुलांचि.. ही भावना मनात असेल तर ती काढून टाका. काळ आणि भवताल बदलला आहे हे आधी समजून घ्या.

मुलांना सक्तीने संस्कार केंद्रात पाठवणे, बोध कथांच्या पुस्तकांचा चारा मुलांच्या पुढ्यात टाकणे, रविवारी सकाळि मुलांना जबरदस्तीने पौराणिक मालिका पाहायला लावणे, त्यांच्यावर सुविचारांची फवारणी करणे, देवाची स्तोत्रे पाठ व्हायलाच हवित अशी दुराग्रही भूमिका घेणे म्हणजे पालकांनी आपलि जबाबदारी झटकणे, असेच मला वाटते. (हे वाचून ज्या पालकांना त्रास होईल त्यांनी त्या-त्या गोष्टी कृपया स्वत:च्या बाबतीत अमलात आणाव्यात.)

हल्ली कसे कुणास ठाऊक पण सुविचारांचे खूप फॅड वाढले आहे.

शाळांच्या भिंतींवर व मुलांच्या उद्बोधन मासिकात सुविचार का शिंपडलेले असतात हे मला अजून तरी कळलेले नाही. सुविचार ही काही अशी गोष्ट नाही कि ती कुणीही सांगावी आणि क्षणात पुढचा मुलगा सुविचारी, सुलक्षणी व सुसंस्कारी व्हावा! सुविचार ऐकून गप्प बसून राहिला मुले म्हणजे काही मातीचे गोळे नव्हेत. मुले प्रश्न विचारणारच. तो त्यांचा हक्कच आहे. आणि मुलांनी जर का प्रश्न विचारले तर मग त्या सुमाणसांची भंबेरीच उडते. हा पुढचा प्रसंग पाहा..

मनाच्या मोटारीला विचारांचे ब्रेक लावा, असं काकांनि मुलांना सांगितल्यावर साहजिकच मुलांनी काकांना विचारलं, काका, या मोटारीला पावसाळ्यात वायपर कशाचे लावायचे? नाहीतर अपघात होईल ना? आणि ही मोटार पेट्रोलवर चालते कि गॅसवर?

या प्रश्नांना त्या काकांनी अत्यंत चलाखीने उत्तरे दिली. त्यासाठी त्यांनी मुलांना कळणार नाहि अशी कठीण, बोजड व अलंकारिक भाषा वापरली आणि त्यांना वाटलं, हुश्श! झाले बुवा संस्कार!

पण इतक्यात त्या अज्ञ मुलाने पुढचा प्रश्न विचारला, काका तुमची गाडी पण अशीच आहे का हो?

हा प्रश्न ऐकल्यावर ते काका गॅसवर आणि गाडी पेट्रोलवर!- साधी सोपी गोष्ट लक्षात ठेवा, सुविचाराने नव्हे तर सुकर्माने संस्कार होतात. आपण काय बोलतो यापेक्षा आपण कसे वागतो हे अधिक महत्वाचे असते. आपण जर चांगलं वागलो तर आपल्यापेक्षा कांकणभर जास्त चांगलं मुले वागतील याबाबत विश्वास बाळगा. ज्यांना आपल्या चांगल्या वागण्याविषयीच शंका असते, त्यांनाच रेडीमेड संकार केंद्रांची गरज भासते, अशी एक चिनी म्हण तुम्ही ऐकलीच असेल म्हणा.

**- राजीव तांबे**

# मराठी चित्रपटसृष्टी महाराष्ट्राचे वैभव - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार प्रदान सोहळा

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) - मराठी चित्रपटसृष्टी, रंगभूमी आणि कलावंत हे महाराष्ट्राचे वैभव असून दादासाहेब फाळके यांच्या 'राजा हरिश्चंद्र' चित्रपटाच्या रुपाने रुजलेलं हे बीज आज वटवृक्ष बनलं आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार २०२५ व चित्रपती कै. व्ही. शांताराम तसेच स्व. राज कपूर जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कार छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार २०२५ तसेच ६० आणि ६१ वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार प्रदान सोहळा वरळी येथे एनएससीआय स्टेडियम, डोम येथे झाला, त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मराठी रंगभूमी ही जगातील सर्वोत्कृष्ट रंगभूमी आहे. छोटा पडदा, मोठा पडदा, ओटीटी प्लॅटफॉर्मसं अशा विविध माध्यमांत मराठी कलावंतांनी अप्रतिम योगदान दिले आहे. केवळ कलावंतच नाही तर पडद्यामागे काम करणाऱ्या सर्वांचा मनापासून गौरव व्हावा, हीच महाराष्ट्र शासनाची भूमिका आहे. राज्य सरकार तुमच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे श्री.फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

अनुपम खेर यांच्या बहुप्रतिभावान अभिनयाचा गौरव करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ङपहिल्याच चित्रपटात ७० वर्षांच्या वृद्धाची भूमि का साकारणारे खेर आजही तितक्याच उत्साहाने अभिनय करत आहेत.ङ

मुक्ता बर्वे यांच्या ३६० अंश अभिनय क्षम तेचा, विशेषतः 'चार चौघी' मधील त्यांच्या



मोनोलॉगचा, तसेच महेश मांजरेकर यांच्या दमदार अभिनय आणि दिग्दर्शनाचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी गौरव केला. गझलकार भीमराव पांचाळे यांचा उल्लेख करताना श्री फडणवीस म्हणाले, सुरेश भट आणि भीमराव पांचाळे यांची जोडी मराठी गझलांना अविस्मरणीय उंचीवर घेऊन गेली.

शिवाजी महाराजांच्या नावाने जागतिक वारसा मिळविणे हे महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानाचे क्षण आहे, असं ते म्हणाले.

मराठी चित्रपटसृष्टी आमचं वैभव आहे आणि ती भविष्यात अधिक समृद्ध होईल, असा मला विश्वास आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**मुंबईत कुठेही चित्रीकरणासाठी नि:शुल्क परवानगी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार**

मुंबईतील कोणत्याही लोकेशनवर चित्रीकरणासाठी परवानगी आता नि:शुल्क दिली जाणार आहे. तसेच राज्यातील विविध चित्रपट निर्मिती स्थळांवर सुलभ दरात सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,असे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले.

मराठी चित्रपटांचे जागतिक पातळीवर प्रमोशन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचा मराठी चित्रपट महोत्सव रवींद्र नाट्यमंदिरात आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. 'एफएम' रेडिओवर मराठी गाणे व कार्यक्रमांसाठी ठराविक वेळ देण्याबाबत एफएम रेडिओ चॅनेल्सशी चर्चा केली असून त्यासाठी पुरस्कार योजना देखील जाहीर केली असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

अमेरिका दौऱ्यात नेटफ्लिक्सच्या लॉस एंजेलिस येथील मुख्यालयात मराठी चित्रपटांना स्थान देण्याची मागणी केल्याचेही श्री शेलार यांनी सांगितले. ङमराठी सिनेमा, चित्रपटगृहे आणि निर्मात्यांना हक्काचे स्थान मिळावे, यासाठी आम्ही टप्प्याटप्प्याने काम करत असल्याचे सांगितले.

या पुरस्कार वितरण कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते गझलगायक भीमराव पांचाळे यांना ङगानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार २०२५ङ प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर पद्मश्री काजोल देवगण यांना स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार २०२४, पद्मभूषण अनुपम खेर यांना स्व.राज कपूर जीवनगौरव पुरस्कार २०२४, अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना चित्रपती कै. व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार २०२४ आणि निर्माते महेश मांजरेकर यांना चित्रपती कै. व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार २०२४ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावर्षीपासून प्रथमच सुरू करण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार २०२५ हा युनेस्कोतील भारताचे कायमस्वरूपी प्रतिनिधी राजदूत विशाल शर्मा यांना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचे जतन व संवर्धन करणाऱ्या अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाचे अध्यक्ष उमेश झिरपे, कार्यकारी अध्यक्ष ऋषिकेश यादव, दुर्ग अभ्यासक माधव फडके यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी ६० आणि ६१ व्या हीरक महोत्सवी महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, फिल्मसिटीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे - पाटील, सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभागाचे संचालक डॉ.तेजस गर्गे, चित्रपट क्षेत्रातील दिग्गज कलाकार, कलारसिक, प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी हीरक महोत्सव स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

# राज्यात १२० वसतिगृहांच्या माध्यमातून २५ हजार विद्यार्थ्यांना निवासी सुविधा उपलब्ध होणार - सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

मुंबई, दि. ६ (प्रतिनिधी) - सामाजिक न्याय विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाची वसतिगृहे उभारण्याचा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. राज्यभरात एकूण १२० ठिकाणी वसतिगृहे उभारली जाणार असून, यामुळे सुमारे २५ हजार विद्यार्थ्यांना निवासी सुविधा उपलब्ध होणार आहेत. वसतिगृहासाठी शासनाने १२०० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह युनिट १, २, ३ व संत एकनाथ मागासवर्गीय मुलांचे वसतिगृहाच्या नूतन इमारतींच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार तुकाराम काते, समाज कल्याण आयुक्त बाबासाहेब बेलदार, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग वंदना कोचुरे उपस्थित होते.

मंत्री श्री. शिरसाट म्हणाले, ज्या ठिकाणी माझा जन्म झाला, तिथे वसतिगृहाचे उद्घाटन करण्याचा योग मला आला आहे. हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे. हे उभारण्यात आलेले वसतिगृह ही फक्त वास्तू नव्हे तर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा एक संकल्प आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला ङशिका आणि संघटित व्हाङ हा संदेश, हीच खरी प्रेरणा आहे जी आपल्याला स्वत:च्या पायावर उभं राहण्यासाठी आवश्यक असलेलं बळ देते. शिक्षण हे सामाजिक, आर्थिक आणि वैयक्तिक प्रगतीचे शक्तिशाली साधन आहे. डॉ.बाबासाहेबांनी दिलेला हा मंत्र स्वीकारूनच आपण आत्मनिर्भर, सशक्त आणि न्याय्य समाज घडवू शकतो. विद्यार्थ्यांना उद्देशून बोलताना ते म्हणाले, भविष्यात तुमच्यामुळे तुमच्या पालकांची समाजात ओळख निर्माण झाली पाहिजे, असे शिक्षण घ्या. स्वत:ची ओळख निर्माण करा. मंत्री ॲड. शेलार म्हणाले, या वसतिगृहातून बाहेर पडणारे विद्यार्थी भविष्यात समाजात मानाचे स्थान मिळवतील, हीच अपेक्षा आहे. वसतिगृहातून शिकून विद्यार्थी आयएएस, आयपीएस, न्यायाधीश, डॉक्टर, इंजिनियर झाले आणि काही वर्षांनी याच प्रांगणात त्यांचा कौतुक सोहळा झाला, तर तो क्षण मला पाहायला नक्कीच आवडेल. राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणाल्या, मुंबईसारख्या वर्दळीच्या शहरात शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणे ही एक मोठी संधी आहे. विद्यार्थ्यांनी या संधीच सोनं करावे. आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मेहनत घ्यावी. विद्यार्थ्यांनी कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम आत्मसात करण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

# वैजापुरच्या तिन्ही पक्षाच्या नवं नियुक्त अध्यक्षांचा राजकीय जीवनाचा पाया महाविद्यालयात विद्यार्थी संसद सचिव म्हणून रचल्या गेला

वैजापूर, दि. ६ (प्रतिनिधी) – येथील विनायकराव पाटील महाविद्यालयात शिकत असतांना संदीप ठोंबरे,राहुल संत व पंकज ठोंबरे हे तिघेही विद्यार्थी संसदेचे सचिव म्हणून निवडून येऊन त्यांनी लोकशाही शासन प्रणाली व राजकीय संघटन म्हणून अनुभव घेतले. आज बुधवार (ता,६)रोजी हे तिघेही वेगवेगळ्या पक्षाचे तालुकाध्यक्ष म्हणून–नियुक्त झालेले असून ते आपले संघटनात्मक कार्य व जबाबदारी अत्यंत चोखपणे बजावत आहेत. हे तिघेही जिवलग मित्र आहेत.

सोबत खेळलेल्या, सोबत वाढलेल्या, सोबत शिकलेल्या समविचारी मित्र मात्र वेगवेगळ्या पक्षांची विचारधारा घेऊन अध्यक्ष झालेले आहेत.





संदीप ठोंबरे हे भाजपाचे तालुक्याच्या दक्षिण विभागाचे अध्यक्ष म्हणून नियुक्त आहेत.

पंकज ठोंबरे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गटाचे) तालुकाध्यक्ष तर राहुल संत हे (काँग्रेस आय), पक्षाचे तालुकाध्यक्ष म्हणून नुकतेच नियुक्त झालेले आहेत. आणि विशेष म्हणजे या तिघांनाही वैजापूरचे जेष्ठतम माजी शिक्षणाधिकारी व समाज कार्यकर्ते ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत यांनी इंग्रजी विषय शिकविण्यासोबत सामाजिक कार्याचे तसेच संस्कार व नितीमतेचे पाठ ही यांना शिकविलेले आहेत. त्यांनी या तिघांचेह मनःपूर्वक अभिनंदन केलेले आहे.

या तिघांचाही राजकीय प्रवास हा कॉलेज जीवनापासून आरंभ झालेला आहे. त्यांचा हा राजकीय प्रवास तालुक्याच्या राजकारणात व विकासात कोणती भूमिका घेऊन ते हा प्रवास चालवितात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

संपूर्ण तालुक्याचे लक्ष या तिघांच्याही कार्याकडे मोठ्या आशेने लागलेले आहे.

# उत्तराखंडमधील ढगफुटी; महाराष्ट्रातील ५१ पर्यटक सुरक्षित

मुंबई, दि. ६: उत्तराखंड राज्यातील धराली (जिल्हा उत्तरकाशी) परिसरात मुसळधार पाऊस व ढगफुटी झाल्याने खीरगंगा नदीला मोठा पूर येऊन अनेक घरांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, उत्तराखंडमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील पर्यटक उत्तरकाशीमध्ये अडकले होते. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील ११ व इतर जिल्ह्यांतील ४० अशा ५१ पर्यटकांचा समावेश असून हे सर्व पर्यटक सुखरूप असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली आहे.

उत्तराखंडमध्ये अडकलेल्या पर्यटकांना आवश्यक मदत करण्यासाठी महाराष्ट्र शासन तत्पर असून पर्यटकांशी संपर्क करत आहे. यासाठी राज्य शासनामार्फत उत्तराखंड आपत्ती व्यवस्थापन केंद्र व उत्तरकाशी जिल्हा आपत्ती केंद्राशी संपर्क साधला जात असून अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी महाराष्ट्र सदन, दिल्ली यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. आवश्यकतेनुसार राज्यातील जिल्हा प्रशासनाला सूचनाही देण्यात आल्या आहेत. येथील परिस्थितीवर सतत लक्ष ठेऊन पुढील सूचना वेळोवेळी दिल्या जाणार असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने कळवले आहे.

संपर्क क्रमांक– राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, महाराष्ट्र : ९३२१५८७१४३ / ०२२–२२०२७९९० / ०२२–२२७९४२२९.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, उत्तराखंड : ०१३५–२७१०३३४ / ८२१

# ‘द बंगाल फाइल्स’ प्रकरणात TMC च्या FIR वर उच्च न्यायालयाची स्थगिती; विवेक रंजन अग्निहोत्री यांना दिलासा

दिग्दर्शक विवेक रंजन अग्निहोत्री यांची बहुप्रतीक्षित फिल्म ‘द बंगाल फाइल्स’ सध्या चर्चेचा विषय बनली आहे. अमेरिकेमध्ये होत असलेल्या वर्ल्ड प्रीमियर दौऱ्यादरम्यानच, ही फिल्म आणि तिचे निर्माते एका नव्या वादात अडकले होते. पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस (TMC) पक्षाच्या काही सदस्यांनी या चित्रपटातील कथित वादग्रस्त आशयावरून विवेक अग्निहोत्री, अभिनेत्री आणि निर्माती पल्लवी जोशी व निर्माता अभिषेक अग्रवाल यांच्या विरोधात अनेक एफआयआर नोंदवले होते.

पण आता या प्रकरणात महत्त्वाची घडामोड घडली आहे. कलकत्ता उच्च न्यायालयाने विवेक रंजन अग्निहोत्री यांना तात्पुरता दिलासा देत, ‘द बंगाल फाइल्स’वर नोंदवण्यात आलेल्या एफआयआरवर अंतरिम स्थगिती दिली आहे. ही कार्यवाही लेक टाउन पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. न्यायमूर्ती जय सेनगुप्ता यांनी दिलेल्या आदेशानुसार, २६ ऑगस्ट २०२५ पर्यंत या प्रकरणी कोणतीही दंडात्मक कार्यवाही होऊ नये, असा स्पष्ट आदेश दिला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १९ ऑगस्ट रोजी होणार आहे.

‘द बंगाल फाइल्स’ या चित्रपटाच्या टीझरने प्रदर्शित होताच जोरदार प्रतिक्रिया मिळवल्या आहेत. हा चित्रपट काहीशा दुर्लक्षित इतिहासावर प्रकाश टाकतो आणि त्या ऐतिहासिक घटनांमागील सत्य मांडण्याचा प्रयत्न करतो. विवेक अग्निहोत्री हे त्यांच्या स्पष्ट, संशोधनाधारित कथानकासाठी प्रसिद्ध आहेत, आणि हा चित्रपट त्यांच्या ‘फाइल्स’ त्रयीचा एक भाग आहे. याआधी त्यांनी ‘द काश्मीर फाइल्स’ आणि ‘द ताशकंद फाइल्स’ या चित्रपटांद्वारे मोठा प्रभाव पाडला आहे.

विवेक अग्निहोत्री आणि पल्लवी जोशी १९ जुलैपासून सुरू असलेल्या अमेरिका दौऱ्यावर असून, तो दौरा १० ऑगस्ट २०२५ रोजी संपेल. त्यांनी आधीच स्पष्ट केले आहे की ‘द बंगाल फाइल्स’ ही फिल्म सखोल अभ्यासावर आधारित असून कोणत्याही राजकीय हेतूने नव्हे, तर ऐतिहासिक सत्य समोर आणण्यासाठी बनवण्यात आली आहे. ही फिल्म ५ सप्टेंबर २०२५ रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटामध्ये मिथुन चक्रवर्ती, अनुपम खेर, पल्लवी जोशी आणि दर्शन कुमार यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. हा चित्रपट तेज नारायण अग्रवाल आणि I Am Buddha Productions प्रस्तुत करत आहेत

# दिव्यांग बांधवांच्या प्रगतीनेच ‘विकसित भारता’ची स्वप्नपूर्ती – राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

मुंबई, दि. ६ (प्रतिनिधी) – भारताला २०४७ पर्यंत विकसित देश करावयाचे आहे. दिव्यांग बांधवांच्या प्रगतीनेच विकसित भारताची स्वप्नपूर्ती होईल, असा आशावाद राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी मुंबई विद्यापीठाच्या सभागृहात आयोजित राष्ट्रीय जलतरण स्पर्धा २०२५ च्या पारितोषिक वितरण सोहळ्यात व्यक्त केला.

कार्यक्रमास यावेळी दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे, स्पेशल ऑलिम्पिक भारताच्या अध्यक्ष डॉ.मल्लिका नड्डा, स्पेशल ऑलिम्पिक भारत महाराष्ट्र शाखेच्या अध्यक्ष डॉ. मेधा सोमैया, महाराष्ट्र स्पेशल ऑलिम्पिक भारतचे महासचिव डॉ. भगवान तलवारे, क्रीडापटू करण नाईक, मूर्तुजा वर्दावाला आदी उपस्थित होते.



राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन म्हणाले, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात बौद्धिकदृष्ट्या दिव्यांगांसाठी खेळ हा त्यांच्या पुनर्वसनाचा व सर्वांगीण विकासाची केंद्रे असावीत. मुंबई येथे आयोजित राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत ४० पेक्षा अधिक इव्हेंट्स घेण्यात आले आहे. ही बाब त्यांच्या एकाग्रतेचे, समर्पणाचे व सेवाभावाचे प्रतीक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या काही वर्षांत दिव्यांग व्यक्तींसाठी केंद्र सरकारने अनेक सुधारणा केल्या आहेत. २०१६ मध्ये लागू करण्यात आलेल्या ‘द राईट्स ऑफ पर्सन्स विथ डिसअॅबिलिटीज अॅक्ट’ अंतर्गत, दिव्यांगतेचे प्रकार वाढविण्यात आले आहेत. तसेच केंद्रीय सेवांमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षण तीन वरून चार टक्के करण्यात आले असून शिक्षणात ते पाच टक्केपर्यंत वाढविण्यात आले आहे, असेही राज्यपाल श्री.राधाकृष्णन यांनी सांगितले.

राज्यात ‘दिव्यांग कल्याण विभाग’ स्वतंत्रपणे स्थापन केला आहे. या विभागांतर्गत बौद्धिकदृष्ट्या दिव्यांग मुलांसाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले जात असल्याबद्दल राज्य शासनाचे अभिनंदन करीत आहे. बौद्धिकदृष्ट्या दिव्यांग असलेल्या व्यक्तींच्या समस्या इतर दिव्यांग व्यक्तींपेक्षा वेगळ्या व अधिक संवेदनशील असतात. बौद्धिकदृष्ट्या दिव्यांग असलेल्यांना समाजाकडून स्वीकाराची, प्रोत्साहनाची आणि संधीची अपेक्षा आहे. दिव्यांगांसाठी संस्था, शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था सर्वांनी मिळून उपचार किंवा शिक्षणापुरती मर्यादित न राहता, त्यांचे संपूर्ण जीवन सुसंवादी बनविणारी प्रणाली विकसित करावी. शासन दिव्यांगाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहे, पण समाज म्हणून आपली भूमिका अधिक व्यापक असली पाहिजे. असेही प्रतिपादनही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी यावेळी केले. भारताची कामगिरी स्पेशल ऑलिम्पिकमध्ये सातत्याने सुधारत आहे.२०२३ मध्ये बर्लिनमध्ये झालेल्या स्पेशल ऑलिम्पिक जागतिक उन्हाळी खेळांमध्ये आपल्या खेळाडूंनी २०० हून अधिक पदके जिंकून भारताचे नाव उज्वल केले असल्याचे गौरवद्गारही राज्यपालांनी यावेळी काढले.

**राज्यात दिव्यांगांच्या खेळांसाठी क्रीडांगण बनविणार – दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे**

देशामध्ये मागील ३२ वर्षापासून स्पेशल ऑलिंपिक चालत आहेत. मुंबईमध्ये बौद्धिकदृष्ट्या दिव्यांगांसाठी राष्ट्रीय जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत राज्यातील २७ जिल्ह्यातून तसेच अन्य राज्यांमधून स्पर्धक सहभागी झाले होते. दिव्यांगांसाठीच्या खेळांना प्रोत्साहन आणि सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या सहकार्यातून राज्यात दिव्यांगांच्या खेळांसाठी समर्पित असलेले क्रीडांगण बनविण्यात येईल, असे इमाव बहुजन कल्याण व दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले. राज्यातील दिव्यांगांसाठी असलेल्या शाळांमध्ये ओपन जिम ची सुविधा देण्यात येणार आहे. यामध्ये त्यांच्यासाठी आवश्यक असलेल्या उपकरणांचा समावेश असेल, असेही मंत्री श्री. सावे म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेधा सोमय्या यांनी केले. प्रस्ताविकात त्यांनी स्पर्धेच्या आयोजना मागील भूमिका स्पष्ट केली. स्पेशल ऑलिम्पिक भारतच्या अध्यक्ष मल्लिका नड्डा यांनी केंद्र शासनाने दिव्यांगांसाठीच्या खेळांचे अनुदान ५ लाखांवरून २० लाख केले असल्याचे आपल्या मनोगतात सांगितले.

जलतरण स्पर्धेतील विविध प्रकारात कांस्य, रजत आणि सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंना पदक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार धावपटू करण नाईक यांनी मानले. कार्यक्रमाला विविध राज्यातून आलेले स्पर्धक, प्रशिक्षक उपस्थित होते.

# साहित्य अकादमीचे बाल साहित्य व युवा साहित्य पुरस्कार २०२६ साठी आवाहन; पुस्तकांच्या नोंदणीला सुरुवात

नवी दिल्ली, दि. ६ (वृत्तसंस्था) – साहित्य अकादमीने बाल साहित्य पुरस्कार २०२६ आणि युवा साहित्य पुरस्कार २०२६ साठी पुस्तकांची नोंदणी सुरू केली आहे. अकादमीने मान्य केलेल्या २४ भारतीय भाषांमधील लेखक, प्रकाशक तसेच साहित्यप्रेमींना आपली पुस्तके पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**बाल साहित्य पुरस्कारासाठी पात्रता** – बाल साहित्य पुरस्कार २०१० पासून दरवर्षी २४ भारतीय भाषांमध्ये उत्कृष्ट बालसाहित्य निर्मितीसाठी दिला जातो. मराठीसह, आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मीरी, कोकणी, मैथिली, मल्याळम, मणिपुरी, नेपाळी, ओडिया, पंजाबी, राजस्थानी, संस्कृत, संथाली, सिंधी, तमिळ, तेलुगु आणि उर्दू या भाषांमध्ये लिहिलेली पुस्तके विचारात घेतली जातील.

पुस्तके ९ ते १६ वयोगटातील मुलांना लक्षात घेऊन लिहिलेली असावीत आणि ती १ जानेवारी २०२० ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत पहिल्यांदाच प्रकाशित झालेली असावीत. अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२५ आहे.

**युवा साहित्य पुरस्कारासाठी पात्रता** – २०११ पासून सुरू झालेल्या युवा साहित्य पुरस्काराचा उद्देश ३५ वर्षांखालील तरुण लेखकांना प्रोत्साहन देणे हा आहे. १ जानेवारी २०२६ पर्यंत लेखकाचे वय ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असावे. अर्जदाराने प्रत्येक पुस्तकाच्या दोन प्रती तसेच जन्मतारखेचा पुरावा (आधार कार्ड, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा मतदार कार्ड) स्व–प्रमाणित प्रतीसह पाठवावा. पुस्तक सादर करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत आहे.

बाल आणि युवा पुरस्कार स्वरूपात ५०,०००/– रूपये रोख, ताम्रपट आणि प्रशस्तीपत्र प्रदान केले जाईल. साहित्य अकादेमीच्या संकेतस्थळावर (www.sahityaakademi.gov.in) पुरस्कारासंबंधी सर्व नियम आणि सविस्तर माहिती उपलब्ध आहे.

# ‘स्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण’ या विषयावर आधारित दोन दिवसीय अनिवासी प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



लोहा, दि. ६ (प्रतिनिधी) – जल जीवन मिशन अंतर्गत ‘स्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण’ या विषयावर आधारित दोन दिवसीय अनिवासी प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम जिल्हा परिषद नांदेड व के.आर.सी. टेक्नोस्पर्ट रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वीरित्या पार पडला.

प्रशिक्षणामध्ये जल जीवन मिशनची सविस्तर माहिती व जलस्त्रोतांचे परीक्षण या महत्त्वाच्या बाबींवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. हे प्रशिक्षण विविध सत्रांमध्ये पीपीटी सादरीकरण तसेच खेळ व प्रात्यक्षिके यांच्या माध्यमातून घेण्यात आले. कार्यक्रमात प्रवीण प्रशिक्षक श्री. राजू गुट्टे, मनोज मोहरील,राधेश्याम राजपूत, अभय भंडारे, साईनाथ मंचेवार, यांनी विषयाचे प्रभावी सादरीकरण केले.

या प्रशिक्षण सत्रास विस्तार अधिकारी आर. बी. टेंभुर्णी, एम. एस. मेहत्री, डी.एच. देशपांडे, परशुराम वाडीकर गट समन्वयक प्रेमचंद कदम (पं. स. लोहा) यांनी उपस्थित राहून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये टेक्नोस्पर्ट ग्राम विकास प्रतिष्ठानचे सचिव श्री. शैलेश सिसोदिया सर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. तर संपूर्ण प्रशिक्षणाचे नियोजन प्रशिक्षण समन्वयक पांडुरंग हूलेकर, आकाश काशिंदे, आकाश कुरे अभिषेक अपशिंदे , आदेश धुळे, पवन काशिंदे, सुधाकर माने यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. हा प्रशिक्षण कार्यक्रम स्थानिक विकास व जलस्त्रोत शाश्वतीकरणासाठी प्रभावी पाऊल ठरला असून उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांकडून याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

# पिंपरी चिंचवड प्रारुप सुधारित विकास आराखडा विरोधात राष्ट्रवादीचा महामोर्चा

पिंपरी, दि. ६ (विजय न्यायाधीश, यांजकडून) – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने नुकताच तयार करण्यात आलेला प्रारुप सुधारित विकास आराखडा हा शहर विकासाशी विसंगत असून त्याविरोधात आवाज उठविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवडतर्फे गुरुवार दि. ७ रोजी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात शहराध्यक्ष योगेश बहल यांनी पत्रकार परिषद घेऊन सविस्तर विवेचन केले.



प्रारुप सुधारित विकास आराखडा २०२५ हा पिंपरी चिंचवड शहराच्या विकासाची दिशा ठरवण्याऐवजी शहराच्या समस्या वाढवणारा आहे. अनेक वैधानिक नियम आणि कायदेशीर आदेशांचे उल्लंघन केलेले या आराखड्यात दिसून येत आहे. महापालिकेच्या आर्थिक हिताविरुद्ध औद्योगिक क्षेत्राचे निवासीकरण, अनावश्यक आरक्षणे आणि आस्तित्वातील बांधकामावर आरक्षण टाकणे यांसारख्या बेकायदेशीर बाबींमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड शहराच्यावतीने हा प्रारुप सुधारित विकास आराखडा रद्द करण्याची मागणी करण्यात येत असून या जनविरोधी आराखड्या विरोधात गुरुवारी आयोजित महामोर्चात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी योगेश बहल यांनी केले. या पत्रकार परिषदेला योगेश बहल यांच्यासह माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, भाऊसाहेब भोईर, प्रशांत शितोळे तसेच महिला अध्यक्ष कविता आल्हाट आदि उपस्थित होते.

# नांदेड येथे जल जीवन मिशन अंतर्गत ‘स्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण’ विषयक दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न



नांदेड, दि. ६ (प्रतिनिधी) – जल जीवन मिशन अंतर्गत ‘स्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण’ या विषयावर आधारित दोन दिवसीय अनिवासी प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

हा कार्यक्रम जिल्हा परिषद नांदेड व के.आर.सी. टेक्नोस्पर्ट रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वीरित्या पार पडला. प्रशिक्षणामध्ये जल जीवन मिशनची सविस्तर माहिती व जलस्त्रोतांचे परीक्षण या महत्त्वाच्या बाबींवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. हे प्रशिक्षण विविध सत्रांमध्ये पीपीटी सादरीकरण तसेच खेळ व प्रात्यक्षिके यांच्या माध्यमातून घेण्यात आले.

कार्यक्रमात प्रवीण प्रशिक्षक श्री. राजू गुट्टे, मनोज मोहरील, राधेश्याम राजपूत, अभय भंडारे ,साईनाथ मंचेवार, यांनी विषयाचे प्रभावी सादरीकरण केले. या प्रशिक्षण सत्रास आरोग्य विस्तार अधिकारी एस. व्ही. गीते, एस. जी. इंगळे, गट समन्वयक चंद्रमणी कांबळे (पं. स. नांदेड) यांनी उपस्थित राहून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये टेक्नोस्पर्ट ग्राम विकास प्रतिष्ठानचे सचिव श्री. शैलेश सिसोदिया सर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. तर संपूर्ण प्रशिक्षणाचे नियोजन प्रशिक्षण समन्वयक पांडुरंग हूलेकर, आकाश काशिंदे, आकाश कुरे अभिषेक अपशिंदे , आदेश धुळे, पवन काशिंदे, सुधाकर माने यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. हा प्रशिक्षण कार्यक्रम स्थानिक विकास व जलस्त्रोत शाश्वतीकरणासाठी प्रभावी पाऊल ठरला असून उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांकडून याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

# ज्यांच्या आई–वडिलांना वृद्धाश्रमात ठेवले जाते, अशा मुलांचा बहिष्कार झाला पाहिजे– जैन संत विरंजन सागरजी महाराज

छत्रपती सभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) – श्री १००८ भगवान मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुख नगर येथे प्रवचनात. मुनिश्री म्हणाले की, वृद्धत्व हे जीवनातील शाप नाही, तर एक वरदान आहे. माणूस वाईट दोन प्रकारे होतो – एक तर वयाने मोठा होतो आणि दुसरा परिस्थितीच्या फटक्याने बदलतो.



वृद्धत्व हे गंजलेल्या लोखंडासारखे असते, परंतु या अवस्थेत पुण्य कमावण्याची संधी असते. माणूस आयुष्यात दोनदा घरातून बाहेर पडतो – एकदा शिक्षणासाठी बालपणी, आणि दुसऱ्यांदा ५५ वर्षांनंतर शांततेसाठी. वृद्धावस्था म्हणजे ज्ञानाची पोटली आणि अनुभवाचा खजिना आहे. त्या कुटुंबांचे नशीब चांगले असते ज्यांच्याकडे वडीलधारी मंडळी असतात. मुनिश्री म्हणाले की, ज्ञ्जर तुम्ही आजोबा झाला असाल, तर ‘दादागिरी’ सोडावी आणि वैराग्य स्वीकारावे. आपल्या प्रवचनात त्यांनी सांगितले की, मंदिरातील मूर्ती माणसांनी बनवल्या, पण माणूस घडवणारे आई–वडीलच असतात. त्यामुळे आई–वडील हेच खरे देव आहेत आणि त्यांचा मान–सन्मान करणे आवश्यक आहे. आज जे वृद्धाश्रम उघडले जात आहेत, ते आपल्या संस्कृतीसाठी शरमेची बाब आहे. ज्या माता–पित्यांना दोन–चार मुले असूनही वृद्धाश्रमात जावे लागते, ते आपल्या समाजाचे अपयश आहे. आजची नवविवाहित पिढी केवळ पैशाच्या मागे लागली आहे आणि त्यांनी आपल्या वृद्धांचे महत्त्व समजणे बंद केले आहे. मुनिश्री पुढे म्हणाले की, बुढापण हे विषाद नसून प्रभूचा प्रसाद आहे.

फ्रेंडशिप डे च्या निमित्ताने त्यांनी सांगितले की, खरे मित्र जर कुणाला बनवायचे असेल, तर प्रभू किंवा आपले आई–वडील यांनाच आपला मित्र मानावे. कारण फक्त आई–वडीलच आपल्या मुलांना नेहमी आशीर्वाद देतात. मुनिश्रींनी वृद्धापकाळ सुखकर होण्यासाठी चार सूत्रे दिली: स्वस्थ जीवन जगावे – व्यायाम करा आणि प्रभूचे भजन करा. जास्त टोका–टोकी करू नये – घरात शांती ठेवा. मोह–माया आणि व्यावसायिक ताणतणावापासून दूर राहा – प्रभूचे स्मरण करा.

संपत्ती संपूर्णपणे मुलांच्या नावे करू नका – काही भाग स्वतःसाठी ठेवा, म्हणजे वृद्धापकाळात आत्मसन्मान टिकतो. युवक भविष्यकाळात जगतो, तर वृद्ध भूतकाळात. तुमची वृत्ती जशी असेल, तसा तुमचा भविष्यकाळ घडेल. म्हणून चांगली वृत्ती ठेवा, असेही मुनिश्रींनी सांगितले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# सरला बेट विकास आराखडा व देवगाव शनि येथील बंधाऱ्यास मंजूरी देणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस







छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- सदगुरु संत गंगागिरी महाराजांच्या अध्यात्मिक परंपरेचा वारसा लाभलेल्या या भागातील भाविक नागरिकांच्या विकासाठी देवगाव शनि येथील उच्च पातळी बंधारा बांधकाम व सरला बेट विकास आराखड़ा यांना मंजूरी देऊ,असे आश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज देवगाव शनि येथे दिले.

देवगाव शनि ता. वैजापूर येथे सदगुरु संत गंगागिरी महाराज यांच्या १७८ व्या अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाची सांगता आज झाली. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री (गोदावरी, कृष्णा खोरे) राधाकृष्ण विखे पाटील, संत रामगिरी महाराज, जलसंपदा मंत्री (तापी, विदर्भ, कोकण) गिरीश महाजन,आ. रमेश बोरनारे,आ. विठ्ठल लंघे,सुरेश चव्हाणके, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र,पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड तसेच अन्य अध्यात्मिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईतून येतांना समुद्राचे दर्शन होते त्याप्रमाणे इथे आल्यावर भाविकांच्या सागराचे दर्शन झाले. १७८ वर्षांची परंपरा असलेला हा अध्यात्मिक सोहळा, भाविकांची शिस्त, तत्परता, त्यांची भाविकता हे सगळं मनाला विलक्षण आनंद देणारे आहे. देशहिताच्या विचाराला मारक असणाऱ्या शक्ती उदयास येतात तेव्हा हे सांस्कृतिक आक्रमण थोपविण्यासाठी संत शक्ती मैदानात उतरते. संतांच्या विचारांचे महत्त्व त्याचमुळे अबाधित आहे.याच विचारांनी छत्रपती शिवाजी महाराजांची रयतेचे स्वराज्य मिळविले. अध्यात्माच्या शक्तीमुळे सकारात्मक उर्जा निर्माण होते आणि मला सकारात्मक कार्याची प्रेरणा मिळते.

या भागातील सरला बेटाचा विकास करण्यासाठी १०९ कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. हा आराखडा लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी मान्यता देण्यात येईल. तसेच देवगाव शनि येथील उच्च पातळी बंधाऱ्याची मागणीही आम्ही लवकरच पूर्ण करु असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. तसेच या सोहळ्याला दरवर्षी येईन असेही आश्वासन दिले.

मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, वारकरी संप्रदायाने जगाला विशाल दृष्टीकोन दिला.हीच आपली खरी संस्कृती आहे. संत गंगागिरी महाराजांच्या या पवित्र स्थानावर होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी १ एकर जागेवर मोठे सभागृह बांधण्यात येईल,असे त्यांनी सांगितले.

मंत्री विखे पाटील म्हणाले की, याभागातील उच्च पातळी बंधारा बांधकामाच्या मागणीला मी दुजोरा देतो. या भागातील या क्षेत्राचा विकास करण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. याभागातील अध्यात्मिक चळवळ ही आम्हा सगळ्यांना मार्गदर्शक आहे. १७८ वर्षांची परंपरा असलेल्या या अखंड हरिनाम सप्ताहाचा आज सांगता सोहळा अर्थात काल्याचे कीर्तन होते. त्यास मुख्यमंत्र्यांसह अनेक मान्यरांनी हजेरी लावली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.कार्यक्रमात सुरुवातीला आलेल्या मान्यवरांचे सप्ताह समितीतर्फे सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांसह अन्य मंत्री महोदय व मान्यवरांनी फुगडी खेळून सांगता सोहळ्याचा आनंद लुटला.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'महावस्त्र पैठणी' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन



छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज जिल्हा माहिती कार्याल यामार्फत तयार करण्यात आलेल्या 'महावस्त्र पैठणी' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. देवगाव शनि ता. वैजापूर येथे अखंड हरिनाम सप्ताह सांगता सोहळ्यास मुख्यमंत्री फडणवीस आले होते. त्यावेळी हा कार्यक्रम पार पडला. जलसंपदा मंत्री (गोदावरी, कृष्णा खोरे) राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री (तापी, विदर्भ, कोकण) गिरीश महाजन,आ. रमेश बोरनारे,आ. विठ्ठल लंघे, सुरेश चव्हाणके, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. जिल्हा माहिती कार्यालयामार्फत जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून हे कॉफीटेबल बुक तयार करण्यात आले आहे. वन नेशन वन प्रॉडक्ट या संकल्पनेंतर्गत जिल्हाधिकारी स्वामी यांनी पैठणी साडी या जिल्ह्याच्या उत्पादनाला चालना दिली आहे. त्यादृष्टीने पैठण येथील उत्पादन असलेल्या पैठणी साडीबाबत सविस्तर माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा शुक्रवारी

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने तसेच इंटरनॅशनल सेंटर ऑफ एक्सल ेस इन इंजिनियरींग अॅड मॅनेजमेंट शुक्रवार, दि.८ रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा गट नं. ४ बजाज ऑटो लि. समोर, छत्रपती संभाजीनगर – पुणे नगर रोड एम. आय. डी. सी. वाळूज येथे होणार आहे. मेळावा सकाळी साडेनऊ वा. सुरुवात होईल. या रोजगार मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी होणार असून, ते थेट मुलाखती घेणार आहेत.

**नामांकीत कंपन्यांचा सहभाग**

मेळाव्यात बीजी-ली-ईन इलेक्ट्रिकल्स लि., मेटलमन ऑटो लि., सुदर्शन सौर शक्ती प्रा.लि.,उमासन्स ऑटो कॉम्प प्रा.लि., पगारीया ऑटो प्रा.लि., औरंगाबाद ऑटो अॅन्सीलरी प्रा.लि., अश्पा ग्लोबल सर्व्हिसेस प्रा.लि., रत्नप्रभा मोटर्स महिंद्रा, साई सुप्रिम इक्युपमेंट, एलीगंट कोटिंग प्रा.ली., समर्थ इलेक्ट्रोकेअर प्रा.ली., टेस्टी बाईट, पूणे, अलंकार इंजिनीअरींग ईक्युपमेंट प्रा.लि सहभागी होणार आहे.

**८४० रिक्त पदे**

या रोजगार मेळाव्यात ८४० रिक्त पदांसाठी कोणत्याही शाखेची पदवी, इंजिनिअरिंग, डिप्लोमा, आय. टी. आय., बारावी (एण), दहावी (एएण) उत्तीर्ण अशा विविध शैक्षणिक आणि व्यावसायिक पात्रतेच्या उमेदवारांची भरती केली जाणार आहे.

**ऑनलाईन नोंदणी सुविधा**

उमेदवारांनी www.rojgar.mahaswayam.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर रोजगार नोंदणी करून, युजर आयडी व पासवर्डद्वारे लॉगिन करून ऑनल ईन अर्ज करावा. अर्ज करताना काही अडचण आल्यास ०२४०-२९५४८५९ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

पात्र उमेदवारांनी शुक्रवार दि.८ रोजी सकाळी साडेनऊ वा. कार्यक्रमस्थळी उपस्थित रहावे व विविध नियोक्त्यांकडे थेट मुलाखती देवून रोजगाराची संधी मिळवावी, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सुरेश वराडे यांनी केले आहे.

# आरती साठे यांच्या नियुक्तीवरून शिवसेना खासदार संजय राऊत यांचा हल्लाबोल

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- देशाची घटनात्मक संस्था असलेला निवडणूक आयोग भाजपचा बटीक झाल्याचा आरोप विरोधकांकडून होत असतानाच आता न्यायपालिकेमधील सुद्धा भाजपशी संबधित माणसे नेमण्यात येत असल्याचा हल्लाबोल पहिल्यांदा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला. भाजप प्रवक्त्या राहिलेल्या आरती साठे यांची थेट मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आल्यानंतर रोहित पवार यांनी आक्षेप व्यक्त करत हल्लाबोल केला. त्यांच्या नियुक्तीवरून काँग्रेसकडूनही हल ्लाबोल करण्यात आला आहे. दरम्यान, आज (६ ऑगस्ट) शिवसेना खासदार संजय राऊत यांनी सुद्धा आरती साठे यांच्या नियुक्तीवरून हल्लाबोल केला आहे.

संजय राऊत यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये पाच ते सहा न्यायमूर्ती भाजपशी संबंधित असल्याचा आरोप केला. इतकेच नव्हे तर ते शाखेत जात होते, त्यांचे कुटुंबही शाखेत जात होतं, असेही म्हटलं आहे. संजय राऊत आरती साठे यांच्या नियुक्तीवर बोलताना म्हणाले की हा भारतीय न्यायव्यवस्थाचा दशावतार आहे. भाजप प्रवक्त्यांची न्यायाधीशपदी नियुक्ती केली जात आहे. त्यांनी पुढे सांगितले की मुंबई हायकोर्टात भाजप प्रवक्त्यांची न्यायाधीशपदी नेमणूक करण्यात आली आहे. इतकेच नव्हे, तर चेन्नई कोर्टामध्येही भाजपच्या प्रवक्त्यांची न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते म्हणाले की कोणताही प्रवक्ता हा त्या पक्षाच्या विचार झालेला बांधील असतो. मात्र, मुंबई उच्च न्यायालयातील पाच ते सहा न्यायमूर्ती हे शाखेत जात होते, त्यामुळे हा न्यायव्यवस्था ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न आहे. निवडणूक आयोगासह देशातील घटनात्मक संस्था गुलाम असाव्यात यासाठीच लोक नेमले जात असल्याचा हल्लाबोल संजय राऊत यांनी केला.

# शेतकरी हित लक्षात घेऊन पाणंद रस्त्यांसाठी धोरण तयार करणार-महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबइ दि.६ (प्रतिनिधी)- प्रत्येक शेताला रस्ता मिळाला पाहिजे, ही राज्य शासनाची भूमिका आहे. यानुसार पाणंद रस्ते तयार करण्याबाबत तयार करण्यात आलेल्या समितीच्या पहिल्या बैठकीत याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली असून सप्टेंबर अखेर सर्वंकष धोरण तयार करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

महसूल मंत्री श्री.बावनकुळे म्हणाले, शेत/ पाणंद रस्ता हा शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. प्रत्येकाच्या शेताला रस्ता मिळावा या उद्देशाने शासनाने १२ फुटांचा रस्ता करण्याचा निर्णय घेतला आहे. हा रस्ता तयार करण्याबाबत आजच्या बैठकीत विविध सूचना करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे जमाबंदी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील एका समितीने याबाबत अभ्यास करुन सूचना केल्या आहेत. या सर्वांचा अभ्यास करण्यासाठी महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट तयार करण्यात येईल. सर्व संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या या अभ्यास गटाने १५ दिवसांत आपला अहवाल आणि सूचना दिल्यानंतर समिती आणि अभ्यासगटाच्या बैठका होऊन सप्टेंबर अखेर अंतिम आराखडा मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

# सिल्लोडजवळ ट्रिपल सीट दुचाकीस्वारांना ट्रकने उडवले; एक जागीच ठार, दोघे गंभीर

सिल्लोड दि.६ (प्रतिनिधी)- जळगाव-छत्रपती संभाजीनगर महामार्गावार डिग्रस (पानस) फाट्यावर ट्रकने दुचाकीस्वारास चिरडले. या अपघातात दुचाकीस्वार महिला जागीच ठार झाली, तर दुचाकीवरील इतर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात मंगळवारी रात्री ८ वाजता झाला. द्वारकाबाई रघुनाथ सोनवणे (वय ७५) असे अपघातात ठार झालेल्या महिलेचे नाव आहे. तर अजय त्र्यंबक सोनवणे (२२), संजीवनी विजय सोनवणे (१५, सर्व रा. डिग्रस) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. गोळेगाव येथील रुग्णालयात उपचार घेऊन ते डिग्रसकडे घरी जात होते. फाट्यावर रस्ता ओलांडताना त्यांच्या दुचाकीला सिल्लोडकडून जळगावकडे जाणाऱ्या ट्रकने (एमपी- ०६, एचजी- ३११४) मागून जोरात धडक दिली. यात द्वारकाबाई उडून ट्रकच्या चाकाखाली आल्याने जागीच ठार झाल्या. तर अजय व संजीवनी दूर फेकल्या गेल्याने गंभीर जखमी झाले. नागरिकांनी त्यांना सिल्लोडच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे जखमींवर उपचार सुरू आहेत. माहिती मिळल्यानंतर अजिंठा ठाण्याचे निरीक्षक अमोल ढाकणे, भागवत शेळके घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ट्रकसह चालकाला ताब्यात घेतले.

# उत्तराखंड येथील ढगफुटीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- उत्तराखंडमध्ये गंगोत्रीच्या मार्गावर ढगफुटीमुळे पूर सदृष्य परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी कळविल्यानुसार सद्यस्थितीत या ठिकाणी परिस्थिती सामान्य असून दुपारनंतर रस्ते खुले होणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

उत्तराखंड येथे अडकलेल्या भाविकांच्या नातेवाईकांनी दुरध्वनीद्वारे संपर्क साधून अडकलेले किंवा संपर्क न झालेल्या भाविकांची माहिती जिल्हा प्रशासनास कळवून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते यांनी केले आहे.

माहितीसाठी संपर्क क्रमांकः- राज्य नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र राज्य संपर्क क्र. ९३२१५८७१४३; जिल्हा नियंत्रणक कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर संपर्क क्र. ०२४० – २३३१०७७ जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती मस्के संपर्क क्र.७३५०३३५१०४.

(पान १ वरुन)

## उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे तीन...

यांच्यासोबत उद्धव ठाकरे यांची डिनर डिप्लोमसी होणार आहे. संसद भवनातील शिवसेना पक्ष कार्यालयाला सुद्धा उद्धव ठाकरे भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्यासह भाजप नेते त्यावेळीच उपस्थित असण्याची शक्यता आहे. त्यामुळे कार्यालयीन भेटीदरम्यान काही धावत्या भेटी होणार का? याकडे सुद्धा लक्ष आहे.

## महायुती सरकारचा सावळा गोंधळ

एकनाथ शिंदे यांच्याकडील नगरविकास खात्याने बेस्ट महाव्यवस्थापक पदाचा पदभार अश्विनी जोशी यांच्याकडे सोपवण्याचे निर्देश दिलेत.

या दोन्ही नेत्यांच्या विभागांनी एकाच दिवशी आदेश काढून एकच पद वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे सोपवण्याचे आदेश दिल्याने प्रशासन बुचकळ्यात पडले आहे. या प्रकरणी नेमक्या कोणत्या विभागाच्या आदेशाचे पालन करायचे? हा विचित्र प्रश्न त्यांच्यापुढे उभा टाकला आहे. दुसरीकडे, मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यातील कथित सुप्त संघर्षातून ही घटना घडल्याचा दावा राजकीय वर्तुळात केला जात आहे.

## महादेवी हत्तीणीला कोल्हापूरला...

निर्णय वनताराने घेतला असल्याचे त्यांनी मला आश्वस्त केले आहे. या चर्चेदरम्यान त्यांनी मला सांगितले की, आम्ही केवळ मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालन केले आणि महादेवी हत्तीणीचा ताबा घेण्याचा आमचा कुठलाही प्रयत्न नव्हता. कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी मठानजीक वन विभागाने निवडलेल्या जागेवर या महादेवी हत्तीणीसाठी पुनर्वसन केंद्र उभारण्यास राज्य सरकारला सर्वतोपरी मदत करण्याची तयारी सुद्धा वनताराने दर्शविली आहे. विविध समाजांच्या धार्मिक भावनांचा आम्ही सन्मानच करतो, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## शेतकऱ्यांसाठी बच्चू कडू राज ठाकरेंच्या....

प्रश्न बच्चू कडू यांनी विचारला आहे. शेत मालाला भाव भेटत नाही, हे दुष्काळापेक्षा जास्त मोठे नुकसान आहे. मागील दोन वर्षांपासून भाव भेटलेला नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्या होत आहेत. हा विषय फडणवीस यांच्या लक्षात यावा यासाठी आंदोलन सुरू असल्याचे कडू यांनी म्हटले आहे.

शेतकरी निवडणुकीत एकत्र राहत नाही, हे दुर्दैव आहे. मात्र आम्ही याकडे राजकारण म्हणून पाहत नाही. राजू शेट्टी असेल आम्ही असो, सर्वजण शेतकऱ्यांसाठी लढत आहोत. मात्र राजकारणात शेतकरी नेते यशस्वी होत नाहीत. हे दुर्दैव राहिले असल्याचे बच्चू कडू यांनी म्हटले आहे. मात्र निवडणुकीचा विषय आता काढणार नाही. आम्हाला शेतकऱ्यांना न्याय देणे जास्त महत्त्वाचे वाटत असल्याचे कडू यांनी म्हटले आहे.

## शिवसेना-मनसेप्रणित उत्कर्ष पॅनेल मैदानात

निवडणुकीत ठाकरेंची शिवसेना आणि मनसेची युती झाल्याची माहिती समोर आली आहे. बेस्ट पतपेढीची निवडणूक १८ ऑगस्ट रोजी पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी येथील मनसे आणि ठाकरेंची शिवसेना संघटनांची युती झाल्याचे समजते. ठाकरेंच्या शिवसेनेची बेस्ट कामगार सेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण बेस्ट कर्मचारी सेने युती झाली असून प्रणित उत्कर्ष पॅनल या निवडणुकीत निवडणूक एकत्र निवडणूक लढणार आहेत. त्यामुळे, गेल्या काही महिन्यांपासून राज्यात ठाकरे बंधुंच्या युतीची चर्चा जोर धरत असतानाच आता महापालिका निवडणुकांपूर्वीच शिवसेना-मनसेची युती झाल्याचं पाहायला मिळत आहे.

## जगात अमेरिकेपेक्षा भारताचे योगदान अधिक

वर्तविला.

व्यापार कराची टांगती तलवार असतानाही, अनेक जागतिक अर्थसंस्थांनी खालावलेले अंदाज व्यक्त केले असतानाही मध्यवर्ती बँकेने देशाच्या विकासदराबाबत अंदाज ६.५ टक्क्यांवर कायम ठेवल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना मल्होत्रा म्हणाले, भारताचा आकांक्षी विकास दर आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी अंदाजित ६.५ टक्क्यांपेक्षा जास्त दिसून येऊ शकेल. गेल्या काही काळात देशाने वार्षिक सरासरी ७.८ टक्क्यांनी वाढ केली आहे.

## मराठवाडा, विदर्भात मुसळधार पावसाचा इशारा

बुलढाणा, अमरावती या जिल्ह्यांमध्ये ८ ते १० ऑगस्ट दरम्यान पावसाचा प्रभाव वाढणार आहे. यामुळे शेतीकामावर परिणाम होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे.

६ ऑगस्टपासून सुरुवात होणाऱ्या पावसाच्या सत्रात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूरसह घाटमाथ्याचे जिल्हे सर्वाधिक प्रभावित होणार आहेत. या भागांमध्ये पावसाचा जोर अधिक असणार असून दरडी कोसळण्याचा धोका वाढू शकतो. कोकण किनारपट्टीवर मुसळधार पावसामुळे पूरसदृश स्थिती निर्माण होण्याची शक्यता असून, स्थानिक प्रशासनाने आधीपासूनच खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे.


## नगर परिषद वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

ज्ञा.क्र.नपवै/कावी/६/२०२५/८६६ दिनांक :- ०६/०८/२०२५

### ई-निविदा सूचना क्र. ०७ व ०८ सन २०२५-२६

वैशिष्ट्यपूर्ण योजना अंतर्गत ०६ कामे, स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत ०१ काम, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा अंतर्गत ०१ काम व लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत ०१ काम असे एकूण ०९ कामांसाठी B1 (Percentage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रशासक तथा मुख्याधिकारी नगर परिषद वैजापूर यांचेकडून मागविण्यात येत आहे. कामासंबंधीचा सविस्तर तपशील दि.०७/०८/२०२५ पासून www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार प्रशासक तथा मुख्याधिकारी नगर परिषद वैजापूर यांनी राखून ठेवला आहे. सदर निविदा सूचना मध्ये काही बदल होत असल्यास उपरोक्त संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**बी.यु.बिघोत (राजपूत)**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**